वर्ष : ०६ | अंक: १३ | मुंबई, मंगळवार १८ फेब्रुवारी २०२० ते सोमवार २४ फेब्रुवारी २०२० | पृष्ठ: ४

# पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

WeWite: www.policebatmipatra.com
www.policebatmipatra.in

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक | सह संपादक:- सौ अश्विनी नाईक-परब

PG 2 दहिसर भूखंड प्रकरणी ४ पोलीस अधिकारी निलंबित

3 → मेट्रो ३ चे सत्य - भूयारी रेल्वे, 'मौत का कुवा'

'विनाअनुदानित गॅस' सिलिंडरच्या दरात वाढ ← 4

निर्भया दोषींच्या शिक्षेला 'तारिख पे तारिख'

# दोषींवर 'डेथ वॉरंट' जारी

## आता ३ मार्चला फाशी होणार

**नवी दिल्ली : पटियाला हाऊस न्यायालयाकडून डेथ वॉरंट जारी करण्यात आलंय. ३ मार्च रोजी सकाळी ६.०० वाजता निर्भयाच्या दोषींना फासावर चढवण्याचे आदेश न्यायालयानं दिलेत. मुकेश कुमार सिंह (३२), पवन गुप्ता (२५), विनय कुमार शर्मा (२६) आणि अक्षय कुमार (३१) अशी या दोषींची नावं आहेत. आपल्याकडे अजूनही कायदेशीर पर्याय उपलब्ध असल्याचा दावा दोषींचे वकील ए पी सिंह यांनी केलाय. दोषींच्या वकिलांच्या म्हणण्यानुसार, अक्षयसाठी ते नवी दया याचिका करणार आहेत. पवनकडेही क्युरेटीव्ह पिटिशन आणि राष्ट्रपतींकडे दया याचिका पाठवण्याचे पर्याय उपलब्ध आहेत.**



११ फेब्रुवारी रोजी निर्भयाच्या आई-वडिलांनी दोषींविरुद्ध डेथ वॉरंट काढण्यासाठी याचिका दाखल केली होती. यापूर्वी पटियाला हाऊस न्यायालयानं डेथ वॉरंटमध्ये २२ जानेवारी रोजी दोषींना फासावर लटकावण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर पुन्हा एकदा १ फेब्रुवारी फाशीच्या शिक्षेची अंमलबजावणी केली जाणार होती. परंतु, न्यायालयानं ३१ जानेवारी रोजी एका याचिकेवर सुनावणी करताना या शिक्षेची अंमलबजावणी थांबवली होती. हे सगळे दोषी न्याय प्रक्रियेशी खेळत असल्याचा आरोप निर्भयाच्या आई-वडिलांनी केला होता. सोमवारी तिसऱ्यांदा दोषींविरुद्ध डेथ वॉरंट काढण्यात आलंय. यासाठी आम्हाला अधिक त्रास सहन करावा लागला. परंतु, अखेर डेथ वॉरंट निघालं याचं समाधान आहे. ३ मार्च रोजी दोषी फासावर चढतील, अशी मी आशा करते, अशी प्रतिक्रिया या निकालानंतर निर्भयाची आई आशा देवी यांनी दिलीय.



### मी उमेद हरणार नाही - निर्भयाची आई

**'न्यायालयाच्या प्रत्येक सुनावणीसाठी आम्ही नव्या उमेदीसहीत जातो. परंतु, दोषींचे वकील प्रत्येक वेळी नवीन पळवाटा शोधून काढतात. आजही काय होईल हे मला माहीत नाही पण उमेद हरणार नाही' अशी प्रतिक्रिया निर्भयाची आई आशा देवी यांनी सुनावणीपूर्वी व्यक्त केलीय.**

दिल्लीतील मुनारिकाजवळ १६ डिसेंबर २०१२ रोजी राजी ९ वाजल्याच्या सुमारास चालत्या बसमध्ये पॅरामेडिकलची विद्यार्थीनी असलेल्या 'निर्भया'वर अत्यंत क्रूर पद्धतीनं सामूहिक बलात्कार करण्यात आला होता. २९ डिसेंबर रोजी सिंगापूरच्या माऊंट एलिजाबेथ रुग्णालयात निर्भयानं अखेरचा श्वास घेतला.

या घटनेचे पडसाद संपूर्ण देशभर उठले होते. १७ डिसेंबर रोजी पोलिसांनी मुख्य आरोपी असलेल्या राम सिंह सह तिघांना अटक केली. त्यानंतर पुढच्या चार-पाच दिवसांत इतर तीन आरोपींना ताब्यात घेण्यात आलं. यामध्ये चालक राम सिंहचा भाऊ मुकेश सिंह, विनय शर्मा, पवन गुप्ता, अक्षय कुमार सिंह आणि एक अल्पवयीन या आरोपींचा समावेश होता.




# जीएसटी भवनमध्ये लागलेल्या आगीची चौकशी होणार - अजित पवार



**मुंबई** : माझगांव येथील जीएसटी भवनच्या ८ व्या मजल्यावर सोमवारी दुपारी भीषण आग लागली. या आगीवर अग्निशमन दलाच्या जवानांनी नियंत्रण मिळविले. या आगीचे कारण अद्याप अस्पष्ट आहे. मात्र, जीएसटी भवनात जीएसटीबाबत अनेक कागदपत्रांचा साठा असल्याने या आगीत



उर्वरित पृष्ठ 2 वर

# CM उद्धव ठाकरे आंगणेवाडीत; नाणारवर बोलणे टाळले

**सिंधुदुर्ग: मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आंगणेवाडीतील भराडी देवीच्या यात्रोत्सवाला उपस्थिती लावत सोमवारी देवीचे दर्शन घेतले. आंगणेवाडी ग्रामस्थ मंडळाच्यावतीने यावेळी मुख्यमंत्र्यांचा सत्कार करण्यात आला. दरम्यान, मुख्यमंत्री आज नाणार विषयी काही भाष्य करतील, अशी अपेक्षा होती पण मुख्यमंत्री काहीही न बोलता सिंधुदुर्ग जिल्हा आढावा बैठकीसाठी निघून गेले.**



भराडी देवीची यात्रा मोठ्या दिमाखात सुरू झाली असून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून भाविक या यात्रेला आले आहेत. भाविकांची कोणतीही गैरसोय होऊ नये म्हणून दर्शनाच्या ९ रांगा तयार करण्यात आल्या असून पोलीस बंदोबस्तही मोठ्या प्रमाणात ठेवण्यात आला आहे. अनेक मान्यवर व्यक्तींची यात्रेला उपस्थिती आहे. आंगणेवाडी ग्रामस्थ मंडळाचा सत्कार स्वीकारून मुख्यमंत्री जिल्हा आढावा बैठकीला निघाले. उद्योग मंत्री सुभाष देसाई, उच्च शिक्षण मंत्री उदय सामंत, परिवहन मंत्री अनिल परब, खासदार विनायक राऊत, माजी मंत्री दीपक केसरकर, आमदार वैभव नाईक, अतुल रावराणे त्यांच्या समवेत होते.

# मराठमोळ्या संस्कृतिचा मिसळ महोत्सव मिराभाईंदरमध्ये मोठ्या धुमधडाक्यात पार पडला

दि. १६.०२.२०२० मिरा भाईंदर येथे हिंदुह्दयसम्राट श्रीमान बाळासाहेब ठाकरे मैदानात मागील पाच वर्षे सतत मराठमोळी संस्कृति जोपासण्याचे कार्य कोल्हापूर मिसळ या माध्यमातून कार्यक्रम घेण्यात येतो . याचे मुख्य वैशिष्ठ म्हणजे सर्व इतरत्र विखुरले गेलेल्या मराठमोळया माणसांना एकत्रित करुन लोप पावत चाललेली आपली संस्कृतिचे प्रदर्शन येथे मोठया प्रमाणात साजरे केले जाते. यावेळी अनेक विविध क्षेत्रात कामगिरी बजावलेले महानूभव येथे कोल्हापूर मिसळ ला भेट देतात. तसेच सतत चार दिवस येथे लोकसंगीत लावणीचे कार्यक्रम सादर करण्यांत येतात. सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी येथे आपली हजेरी लावतात. हजारोंच्या संख्येने येथे माणसांचा गाजावाजा असतो. मिसळ महोत्सवात अनेक प्रकारच्या मिसळ येथे चाखण्यासाठी माणंसाची गर्दी असते. या कार्यक्रमाचे आयोजन संस्थापक विजय पाटील अध्यक्ष सरदार आमते व सचिव रावसाहेब पाटील यांच्या सोबत सर्व मित्रमंडळीच्या वतीने करण्यांत येत. मान्यवराचे या कार्यक्रमात स्वागत मोठया प्रमाणत करण्यांत येते. सर्व कार्यर्क्ते आपल्या मावळयांच्या वेषभूषेत हजर असतात. असा हा मराठमोळा कार्य मिराभाईंदरमध्ये चार दिवस सतत साजरा करण्यात आला.







### मिरा-भाईंदरमध्ये शिवप्रेमी व सामाजिक संस्थाच्यावतीने

# भव्य शिवजन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन

**मिरारोड- मराठी एकीकरण समिती, अनेक सामाजिक संस्था आणि शिवप्रेमी यांच्या सहकार्याने भाईंदर येथील बाळासाहेब ठाकरे मैदानात शिवजन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. त्या निमित्ताने दोन दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.**




शिवजन्मोत्सव निमित्ताने १८ व १९ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाबाबत माहिती देताना मराठी एकीकरण समितीचे अध्यक्ष गोवर्धन देशमुख यांनी सांगितले की, १८ फेब्रुवारी रोजी महापालिकेच्या मराठी शाळांतील विद्यार्थ्यांसाठी चित्रकला, वकृत्व स्पर्धा, गड किल्ले प्रतिकृती बनविणे तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. तसेच शिवकालीन शस्त्रांचे प्रदर्शन सुद्धा आहे. तर संध्याकाळी महिलांसाठी विशेष पैठणी स्पर्धात्मक कार्यक्रम ठेवण्यात आला आहे. तर १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता काशीमिरा येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन मानवंदना देण्यात येईल. त्यानंतर ९.३० वाजता महाराजांच्या पुतळ्या जवळून दुचाकी, चारचाकी वाहनांसह शहरात भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. तर दुसऱ्या टप्प्यात संध्याकाळी ६ वाजल्यापासून सुरु होणाऱ्या कार्यक्रमात शिवजन्मोत्सव, हळदीकुंकू समारंभ, शहीर यशवंतराव जाधव यांचा पोवाडा, महाराजांवर आधारित महाराष्ट्र युगपुरुष गाथा हा संगीतमय कार्यक्रम आणि शालेय विद्यार्थ्यांसाठी बक्षीस समारंभ असा कार्यक्रम आखण्यात आला आहे.

## भारतीय रेल्वेची नवी योजना
# अवघ्या ४९ पैशांमध्ये लाखोंचा विमा

**मुंबई : प्रवाशांचा प्रवास अधिक सुखकर आणि निश्चिंत व्हावा यासाठी भारतीय रेल्वे मंत्रालयाकडून बऱ्याचदा काही नव्या योजना राबवण्यात येतात. प्रवाशांना या योजनांचा फायदाही अनेकदा होतो. यातच आता आणखी एका योजनेची भर पडत आहे. ही योजना आहे विमा अर्थात insuranceची. अवघ्या ४९ पैशांमध्ये आता रेल्वे प्रवासाचं तिकीट काढतानाच विमा उतरवता येणार आहे.**

ऑनलाईन तिकीट बुक करतेवेळी इंडियन रेलवे कॅटरिंग एण्ड टूरिजम कॉर्पोरेशन अर्थात आयआरसीटीसीच्या संकेतस्थळावर तुम्हाला एक पर्याय विचारण्यात येईल. ज्यामध्ये विमा उतरवण्यास तुम्ही तयार आहात का, असा प्रश्नही केला जाईल. या योजनेअंतर्गत प्रवासी त्यांच्या प्रवासादरम्यान अवघ्या ४९ पैशांमध्ये त्यांचा प्रवास विमा उतरवू शकणार आहेत.

IRCTCच्या संकेतस्थळावर तिकीट काढतेवेळी या प्रक्रियेतील अखेरच्या टप्प्यावर तुम्ही विमा घेऊ इच्छिता का, असा पर्याय तुम्हाला विचारण्यात येतो. हा पर्याय निवडल्यास तुमच्याकडून ४९ पैसे इतका दर आकारला जाईल. ४९ पैसे दिल्यानंतर तुम्हाला १० लाखांचा प्रवास विमा दिला जातो. रेल्वे प्रवासादरम्यान कोणत्याही प्रकारची दुर्दैवी घटना घडल्यास प्रवासी आणि त्यांच्या कुटुंबीयांना या विम्याचा फायदा होणार आहे. प्रवास विमा घेण्याचा निर्णय प्रवासी स्वत: करु शकतात. त्यांना हा विमा नको असल्यास ते हा पर्यायही निवडू शकतात.

IRCTCच्या संकेतस्थळावर किंवा ॲपच्या माध्यमातून तिकीट काढतेवेळी विम्याचा पर्याय तुमच्यासमोर येतो. तिकीट बुक झाल्यानंतर प्रवाशांचाय एसएमएस किंवा ई-मेल अथवा या दोन्ही माध्यमांतून त्यांच्या नॉमिनीविषयी माहिती देण्यासाठीची एक लिंक पाठवली जाते. या लिंकवर क्लिक केलं असता तुम्ही थेट इंश्युरन्स कंपनीच्या संकेतस्थळावर पोहोचता. जिथे तुम्ही नॉमिनीविषयीची संपूर्ण माहिती भरु शकता. ध्ंण्ऊण्कडून देण्यात आलेल्या माहितीनुसार १० लाख रुपयांच्या या विम्याचा फायदा फक्त कन्फर्म आणि RAC तिकीट धारकांनाच होणार आहे. वेटिंग लिस्ट किंवा ई- तिकिटधारकांना याचा फायदा नाही. पाच वर्षांहून कमी वय असणाऱ्या बालकांनाची या विम्याअंतर्गत स्थान देण्यात आलेलं नाही.



### कोणत्या परिस्थितीत विम्याची रक्कम मिळू शकते?

प्रवास विम्याअंतर्गत मिळणारी रक्कम ही दुर्घटनेत तुमचं झालेलं नुकसान किती आहे, यावरुन निर्धारित करण्यात येते. नुकसानाची विभागणी ही पाच वर्गांमध्ये केली आहे. रेल्वे दुर्घटनेत प्रवाशाला कायमस्वरुपी अपंगत्व आल्यास किंवा मृत्यू झाल्यास १० लाख रुपयांचा क्लेम मिळू शकतो. शिवाय प्रवासादरण्यान मृत्यू झाल्यास मृतदेह नेण्यासाठी वाढीव १० हजार रुपयांचीही मदत करण्यात येते. रेल्वे प्रवासातील दुर्घटनेमध्ये काही अंशी अपंगत्व आल्यास या परिस्थितीत ७.५ लाख रुपये आणि जखमी अवस्थेत रुग्णालयात दाखल झाल्यास २ लाख रुपयांचा क्लेम मिळतो.

## दहिसर भूखंडप्रकरणी ४ पोलीस अधिकारी निलंबित

**दहिसर येथील भूखंड प्रकरणात केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) गुन्हा नोंदवलेल्या सहापैकी चार आरोपी पोलीस अधिकाऱ्यांना शनिवारी निलंबित करण्यात आले. उर्वरित दोन पोलीस अधिकारी साहाय्यक आयुक्त-उपअधीक्षक दर्जाचे असल्याने त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी शिफारस मुंबई पोलिसांनी गृहविभागाकडे केली.**

पोलीस निरीक्षक संजीव तावडे, साहाय्यक पोलीस निरीक्षक काकासाहेब शिंदे, अनंत जाधव आणि पोलीस उपनिरीक्षक रेखा सायकर अशी निलंबित करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांची नावे आहेत. साहाय्यक पोलीस आयुक्त प्रशांत मर्दे, उपअधीक्षक सुभाष सावंत यांच्यावरील कारवाईचा निर्णय गृहविभाग घेणार आहे. सीबीआयने या सहा अधिकाऱ्यांविरोधात खटला दाखल करण्याची परवानगी गृहविभागाकडे मागितली होती. गृहमंत्री अनिल देशमुख यांनी परवानगी दिल्यानंतर ही कारवाई केली गेली, असे मुंबई पोलीस दलातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने स्पष्ट केले.




### प्रकरण काय?

दहिसर चेकनाक्याजवळ बांधकाम व्यावसायिक ज्यूड रोमेल यांनी विकत घेतलेला १६ एकरचा भूखंड कमरुद्दीन शेख आणि कुटुंबीयांनी या आरोपी पोलीस अधिकाऱ्यांच्या मदतीने हडपला. शेख कुटुंबाला मदत करण्यासाठी या आरोपी पोलीस अधिकाऱ्यांनी रोमेल यांच्याविरोधात खोटा गुन्हा नोंदवला. त्यात ते ४५ दिवस अटकेत होते. जामिनावर मुक्त होताच त्यांनी उच्च न्यायालयात याचिका केली. उच्च न्यायालयाने हे प्रकरण सीबीआयकडे सोपवले. सीबीआयने गुन्हा नोंदवून पुरावा गोळा केला आणि या अधिकाऱ्यां-विरोधात खटला दाखल करण्याची परवानगी गृहविभागाकडे मागितली. मात्र राज्य पोलीस मुख्यालयाने या सहा अधिकाऱ्यांविरोधात सीबीआयकडे ठोस पुरावा नसल्याने परवानगी देऊ नये, असा अभिप्राय दिला. मात्र गृहमंत्रालयाने विधि व न्याय विभागाच्या अभिप्रायाआधारे सीबीआयला परवानगी दिली.

## राज्यातील पोलिसांसाठी असलेली कुटुंब आरोग्य योजना पुन्हा सुरू

राज्यातील पोलिसांना लागू असलेली महाराष्ट्र पोलीस कुटुंब कल्याण योजना शासनाने पुन्हा कार्यान्वित केली आहे. यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करून दिला असल्यामुळे या योजनेचा पोलिसांनी लाभ घ्यावा, असे आवाहन पोलीस महासंचालकांनी केले आहे.

राज्यातील पोलिसांसाठी असलेल्या या योजनेअंतर्गत रुग्णालयातील देयके थकीत असल्यामुळे लाभ मिळत नव्हता. ही बाब नागपूर येथील महाराष्ट्र पोलीस परिवार व पोलीस मित्र न्याय हक्क संघर्ष समितीने मुख्यमंत्री उद्धव ठाकरे तसेच गृहमंत्री अनिल देशमुख तसेच अतिरिक्त गृहसचिवांच्या निदर्शनास आणून दिले होते. पोलीस महासंचालक सुबोध जैस्वाल यांनीही पाठपुरावा केला होता. अखेरीस ५० कोटींचा निधी राज्य शासनाने मंजूर केला आहे. तसेच महासंचालकांनाही अतिरिक्त १० कोटींचा निधी कुटुंब कल्याण निधीसाठी वापरण्यास अनुमती दिली आहे. महाराष्ट्र पोलीस कुटुंब कल्याण योजना लागू असलेल्या दवाखान्यामध्ये पोलीस कर्मचारी अधिकाऱ्याने भरती होते वेळी पोलीस असल्याचे ओळखपत्र दाखविणे बंधनकारक आहे. रुग्णाला भरती केल्यानंतर दवाखान्यात चांगले उपचार मिळत नसतील तर रुग्णाला अन्यत्र हलविताना तेथील वैद्यकीय अधिकाऱ्याचा शेरा आवश्यक आहे. अन्यथा या योजनेचा लाभ मिळत नाही, याकडेही या संघटनेने लक्ष वेधले आहे.

## Child Porn शेअर करणाऱ्या भाजी विक्रेत्याला पोलिसांनी ठोकल्या बेड्या

चाईल्ड पॉर्न शेअर करण्याच्या धाडसामुळे एका भाजी विक्रेत्याच्या हातात बेड्या पडल्या आहेत. मुंबई पोलिसांनी ही कारवाई केली असून, हरिप्रसाद पटेल असं आरोपीचं नाव आहे. तो मूळचा उत्तर प्रदेशचा रहिवाशी आहे. तर अंधेरीत भाजीपाला विक्रीचा व्यवसाय करतो.

फेसबुकवरून मोठ्या प्रमाणात चाईल्ड पॉर्न शेअर केलं जात आहे. याविरोधात खुद्द फेसबुकनेच मोहीम उघडली असून, चाईल्ड पॉर्न शेअर करणाऱ्यांची माहिती फेसबुक पोलिसांना देत आहे. त्यावरून पोलिसांकडून तातडीनं कारवाई केली जात आहे. चाईल्ड पॉर्न शेअर करण्यात आल्याचा एक प्रकार समोर आला असून, पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

अंधेरीत भाजीपाला विक्रीचा व्यवसाय करणाऱ्या हरिप्रसाद पटेल यांने फेसबुकवरून अश्लील व्हिडीओ शेअर केला होता. याप्रकरणी पोलिसांना माहिती मिळाली. पोलिसांनी तपास करत अंधेरीत राहत असलेल्या हरिप्रसाद पटेलला अटक केली.



### दुसऱ्यांदा चूक भोवली

मूळचा उत्तर प्रदेशचा असलेल्या हरिप्रसाद यानं यापूर्वीही चाईल्ड पॉर्नचे व्हिडीओ फेसबुकवरून अपलोड केले होते. वर्षभरापूर्वी पोलिसांनी गुन्हा दाखल करून त्याचं फेसबुक अकाऊंट बंद केलं होतं. मात्र, हरिप्रसादनं मित्राच्या मोबाईलवरून नवीन फेसबुक अकाऊंट सुरू केलं आणि चाईल्ड पॉर्नचा व्हिडीओ शेअर केला. दुसऱ्यांदा केलेली चूक हरिप्रसादच्या अंगलट आली.

### चाईल्ड पॉर्नबद्दलची धक्कादायक आकडेवारी

काही महिन्यांपूर्वीच अमेरिकेनं भारताला चाईल्ड पॉर्नसंबंधी धक्कादायक आकडेवारी दिली होती. भारतात गेल्या पाच महिन्यात चाईल्ड पॉर्नशी संबंधित २५ हजार मटेरिअल वेगवेगळ्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर अपलोड करण्यात आलं आहे. ही आकडेवारी अमेरिकेच्या नॅशनल सेंटर फॉर मिसिंग ॲण्ड एक्स्प्लॉयटेड चिल्ड्रनने (NCMEC) भारताच्या नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्युरोकडे सोपवली आहे. भारत आणि अमेरिकेमध्ये गतवर्षी हा डेटा शेअर करण्यासंबंधी करार झाला होता. या अहवालातून मुंबई, ठाणे आणि पुण्यात चाईल्ड पॉर्नची सर्वात जास्त प्रकरणं समोर आली आहे. फक्त मुंबईत ५०० प्रकरणं आहेत.

## करोनाचा फटकाः खेळणी बाजार संकटात

***मुंबई - चीनचा दबदबा असल्याने आयात शुल्कात केलेली वाढ व आता करोना विषाणूची साथ, या दोन कारणांमुळे भारतीय खेळणी बाजार सध्या प्रचंड संकटात आहे. देशातील एकूण बाजाराच्या ४० टक्के उलाढाल असलेल्या मुंबईतील या क्षेत्रातील विक्री १५ टक्क्यांपर्यत घसरली आहे. मागणी नसतानाही खेळण्यांचे मागील दोन वर्षात दुप्पट होऊन सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेले आहेत.***



खेळणी बाजारात मागील १० ते १५ वर्षात चीनचा दबदबा चांगलाच वाढला. एरव्ही भारतात तयार झालेले एखादे ३०० रुपयांचे खेळणे चिनी बनावटीचे असल्यास त्याची किंमत जेमतेम ६० ते ८० रुपयांचे असते. यामुळेच देशातील एकूण मागणीच्या ७५ ते ८५ टक्के खेळणी आयात होतात. त्यापैकी ७५ टक्के खेळणी एकट्या चीनमधून येतात. चीनखेरीज सिंगापूर, मलेशिया आणि श्रीलंका येथील खेळणी भारतात आयात होतात. चीनची ही आयात कमी करण्यासाठी केंद्र सरकारने मागील दोन वर्षात आयात शुल्कात ५०० टक्के वाढ करून आता आयात शुल्क ६० टक्के करण्यात आले आहे. यामुळे खेळणी बाजार संकटात असल्याचे युनायटेड टॉय असोसिएशनचे म्हणणे आहे.

असोसिएनशचे प्रवक्ते रेहान दोरजीवाला यांनी 'मटा'ला सांगितले की, 'खेळणी हे क्षेत्र जवळपास ४ हजार कोटी रुपयांचे आहे. देशभरात जवळपास १० हजारहून अधिक घाऊक व्यापारी व लाखाहून अधिक किरकोळ विक्रेते या क्षेत्रात आहेत. पण केंद्र सरकारने आयात शुल्कात भरमसाठ वाढ केल्याने खेळण्यांचे दर भरमसाठ वाढले आहेत. खेळणी थेट १०० टक्के महाग झाली आहेत. केवळ श्रीमंत कुटुंबेच आज खेळणी करू शकतात. मध्यमवर्गीयांसाठी खेळणी आवाक्याबाहेर गेली आहेत. यातून विक्री कमी होऊन या क्षेत्रातील रोजगारही संपुष्टात आला आहे.'

एकीकडे आयात शुल्कात वाढ झाली असताना मागील महिनाभरापासून करोना विषाणू साथीचा परिणाम चिनी खेळण्यांवर झाला आहे. आधीच आयात कमी झाली असताना या साथीमुळे चीनखेरीज मलेशिया व सिंगापूर येथील खेळण्यांची आयात थांबली आहे. किमान फेब्रुवारीअखेरपर्यंत तरी करोनामुळे त्या भागातील खेळणी येणे अशक्य आहे. यामुळेच सध्या खेळणी बाजारात प्रचंड मंदीची स्थिती निर्माण झाली आहे.

### क्रॉफर्ड बाजारातील दुकाने बंद

**देशातील खेळण्यांची सर्वात मोठी बाजारपेठ मुंबई आहे. मुंबईत सीएसटी जवळील क्रॉफर्ड बाजारात सर्वाधिक घाऊक व किरकोळ दुकाने आहेत. पण मागणीअभावी अनेक दुकाने ओस पडली आहेत. अनेकांनी दुकाने बंद केली आहेत. 'धंदाच होत नसेल तर दुकाने सुरू का ठेवायचे. त्याऐवजी वेगळा व्यवसाय केला तर थोडी तरी कमाई होईल. यामुळे अनेकांनी दुकाने बंद केली आहेत', असे येथील विक्रेते इरफान वली यांनी सांगितले.**

## कोटक बँकेच्या ग्राहकांची फसवणूक करणाऱ्या इसमाला अटक

**मुंबई - ओर्लेम चर्च समोरील कोटक महिंद्रा बँकेच्या एटीएम मशीनमध्ये इलेक्ट्रॉनिक माध्यमाच्या सहाय्याने बँकेच्या ग्राहकांची फसवणूक करण्यात आली होती. याबाबत कोटक महिंद्रा बँकेच्या मॅनेजरने मालाड पोलीस ठाण्यात तक्रार केली होती. या तक्रारीवरून मालाड पोलिसानी वरिष्ठ पोलीस निरीक्षक जॉर्ज फर्नांडिस यांच्या माग्दार्शनाखाली एका इसमाला अटक करण्यात आली. सदर प्रकरणाचा अधिक तपास पोनि दळवी, सपोनि तांबे करीत आहे तर आरोपीला पकडण्यासाठी पोलीस हवालदार कोंडे, पोलीस शिपाई मस्के व महिला पोलीस शिपाई गवळी यांनी सहभाग घेतला होता.**

२४ सप्टेंबर २०१९ रोजी २०.०० वाजताच्या दरम्यान ओर्लेम चर्च समोरील कोटक महिंद्रा बँकेच्या एटीएम मशीनमध्ये इलेक्ट्रॉनिक माध्यमाच्या सहाय्याने बँकेच्या ग्राहकांची फसवणूक करण्याकरिता एका इसमाने डेबिट व क्रेडिट कार्डची माहिती संकलित करण्यासाठी मूळ एटीएम मशीन वर असलेल्या एटीएम मशीनला स्कीमर डिव्हाईस लावून फसवणूक करण्याचा प्रयत्न केला. याबाबत कोटक महिंद्रा बँकेच्या मॅनेजरने दिनांक २७/०९/१९ रोजी मालाड पोलीस ठाण्यात तक्रार केली होती. सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान प्राप्त झालेल्या एटीएम सेंटरमधील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे गुन्ह्यातील आरोपीताचा शोध घेण्यात येत होता. तपासा दरम्यान सदर आरोपी इसमाच्या ठावठिकाण्याबाबत सपोनि तांबे व पथकास खात्रीशीर माहिती प्राप्त झाल्याने सदर बाबत माननीय वपोनी सो यांना अवगत करून त्यांचे मार्गदर्शनाप्रमाणे बोरीवली परिसरात शोध घेऊन कोटक महिंद्रा बँकेचा एटीएम मध्ये स्कीमर डिव्हाईस व कॅमेरा लावून फसवणूक करण्याचा प्रयत्न करणाऱ्या इसमास ताब्यात घेऊन त्यास अटक करण्यात आली असून सध्या तो पोलीस कोठडीत आहे. या आरोपीविरुद्ध गु र क्र ४०५/१९ कलम ४१९,४२०,४६८,४७१,५११ भादविसह कलम ६६ क ड आयटी ॲक्ट २००० गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा अधिक तपास सुरू आहे.



## राज्यातील अडीच हजारांहून अधिक नवजात बालकांना पक्षाघात; मुंबईत १,२०९ रुग्ण

**मुंबई :** मेंदूला ऑक्सिजनयुक्त रक्ताचा पुरवठा करणाऱ्या रक्तवाहिन्यांमध्ये अचानक अडथळा निर्माण झाल्याने पक्षाघात येतो. या आजारावर वेळेवर उपचार झाले नाहीत, तर मेंदूतील पेशींचे कायमस्वरूपी नुकसान होऊन, मेंदूवर परिणाम केलेल्या घटकांशी संबंधित अपंगत्व किंवा मृत्यू होऊ शकतो. राज्याच्या आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार, दोन वर्षांत शून्य ते पाच वयोगटांतील अडीच हजारांहून अधिक नवजात बालकांना 'पक्षाघात' झाल्याचे निदान झाले आहे.

राज्यात दोन वर्षांत २ हजार ५७९ नवजात बालकांना पक्षाघाताचे निदान झाले. त्यात मुंबई शहर उपनगरात १ हजार २०९ बालकांचा समावेश आहे. मात्र, मुंबईतील रुग्णसंख्येत स्थलांतरित रुग्णांचाही समावेश आहे. मुंबईखालोखाल पुणे शहरात ३५६, ठाण्यात १३२ इतकी रुग्णसंख्या आहे. याशिवाय, औरंगाबादमध्ये दोन्ही वर्षांत एकाही रुग्णाची नोंद करण्यात आलेली नाही. या रुग्णांना 'गोल्डन अवर'मध्ये म्हणजेच २-३ तासांच्या आत उपचार मिळाले, तर तो बरा होण्याची खूप जास्त शक्यता असते.



याविषयी, मेंदूविकारतज्ज्ञ डॉ. शैशवी कोरगावकर यांनी सांगितले की, पक्षाघात म्हणजे अर्धांगवायू होय. वय झाल्यानंतरच अर्धांगवायूचा झटका येतो, असे नाही. जगात दर सहापैकी एका व्यक्तीला आयुष्यात कधी ना कधी हा आजार होतो. हृदयरोग आणि कर्करोगानंतर पक्षाघात हे जगातील मृत्यूचे तिसरे कारण आहे, तर अपंगत्व येण्यासाठी हा आजार पहिले कारण ठरतो. पक्षाघात आल्यावर मेंदूचा जो भाग खराब होतो, त्यात शरीराचा एखादा भाग कमी क्रियाशील होतो. पक्षाघाताची लक्षणे ओळखण्यासाठी चेहरा, हात, बाळाची हालचाल पाहून तत्काळ डॉक्टरांच्या लक्षात आणून द्यावे.

### 'गोल्डन अवर'मध्ये काळजी घेणे गरजेचे

**जन्माच्या वेळी बालकांच्या संदर्भात सर्वात महत्त्वाचा भाग असतो, त्यांचा श्वासोच्छवास सुरू करणे आणि आवश्यकता भासल्यास योग्य पद्धतीने श्वसनाला साहाय्य करणे. बऱ्याचदा या बालकांना जन्मानंतर कृत्रिम श्वासोच्छवास देऊन त्यांची श्वसनक्रिया सुरू करावी लागते. कृत्रिम श्वासोच्छवासाच्या पद्धती वेगवेगळ्या असू शकतात आणि ३७ आठवड्यांनंतर जन्मलेल्या बाळांसाठी वापरल्या जाणाऱ्या पद्धतींच्या तुलनेत काहीशा नाजूक असतात. म्हणजेच, गोल्डन अवरमध्ये बालकांना कृत्रिम श्वासोच्छवास देणे आणि त्यानंतरची काळजी यांचा समावेश असतो. या बाळांना नीओनेटल इंटेसिव्ह केअरमध्ये नेणे हेसुद्धा आव्हान असते. कारण ही बाळं फारच नाजूक असतात आणि या टप्प्यात त्यांच्यामध्ये काही गंभीर समस्या निर्माण होण्याची शक्यता असते. गोल्डन अवरच्या काळात योग्य काळची घेतली जायला हवी. संसर्गाला दूर ठेवणारी काळजी घेतल्यास जंतुसंसर्ग टाळता येतो, तसेच सुरुवातीच्या काळातील काळजी, वजन नोंदविणे आणि स्तनपान याचीही काळजी घेतली जायला हवी, असे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले.**

## मुंबईतील कांदळवनच्या रक्षणासाठी हवेत पुरेसे कर्मचारी

साधारणपणे ९०० हेक्टर चा परिसर आणि त्यावर लक्ष ठेवायला फक्त सहाच्या आसपास कर्मचारीष्ठ ही कहाणी आहे महाराष्ट्र वनविभागाच्या कांदळवन सेलची. घाटकोपर पासून ते कुलाबा पर्यंत प्रचंड मोठा विस्तार असलेल्या सेंट्रल मुंबई रेंज कडे आपल्याकडे असलेल्या कांदळवन यांच्या परिसरावर लक्ष ठेवण्यासाठी एक वनक्षेत्रपाल, दोन वनपाल आणि चार वनरक्षक आहेत. या परिसरात धारावी आणि वडाळा सारखे कांदळवन असलेले विभाग येतात त्यामुळे आम्हाला इथे होणाऱ्या अतिक्रमणांवर लक्ष ठेवावे लागते व तसेच कांदळवनांच्या परिसरात राडारोडा इत्यादी ते डंपिंग होऊ नये हेही पहावे लागते. मात्र हे सगळं करण्यासाठी आमच्याकडे पुरेसे कर्मचारी नाहीत अशी खंत एका वनखात्याच्या ज्येष्ठ अधिकाऱ्याने बोलून दाखवली. एकदा काढण्यात आलेली अतिक्रमण पुन्हा येऊ नये यासाठी वनखात्याने साधारणपणे ४३ कर्मचारी हे महाराष्ट्र राज्य सिक्युरिटी फोर्स यांच्याकडून घेतले आहेत. हे सुरक्षा कर्मचारी नियमितपणे त्या या विभागांमध्ये गस्त घालतात.

पृष्ठ १ वरुन

## जीएसटी भवनमध्ये लागलेल्या आगीची चौकशी होणार - अजित पवार

सर्वच कागदपत्रे जाळून गेल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दरम्यान, आगीची माहिती मिळताच उपमुख्यमंत्री अजित पवार बैठक सोडून घटनास्थळी दाखल झाले होते. यावेळी अजित पवार म्हणाले, 'मी बैठकीत असताना अधिकाऱ्यांचा फोन आला आणि मी तातडीने येथे दाखल झालो. निघण्यापूर्वी मी आयुक्तांना फोन केला आणि माहिती दिली. यानंतर मी पोलीस आयुक्त संजय बर्वे यांना फोन केला. नागरिकांची येण्या-जाण्याची व्यवस्था करा असे सांगितले. कुणी जखमी झाल्याची माहिती अजूनपर्यंत आलेली नाही.'

याचबरोबर, या आगीत किती नुकसान झाले आहे, त्याची माहिती घेतली जाईल. मी अधिकाऱ्यांना विचारले त्यांनी माहिती दिली की सर्व डेटा आपल्याकडे आहे. सर्व डाटा कॉम्प्युटराईज आहे. तसेच, मला माहिती देण्यात आली की, सर्व सुरक्षित आहे, असे अजित पवार म्हणाले. याशिवाय, अशा घटना घडता कामा नये. आपण मंत्रालयाला आग लागली होती तेव्हा सूचना दिली होती की, सर्व इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीत करुन घ्या. यासंदर्भात तपास करण्याची जबाबदारी सरकार घेईल. तसेच जीएसटी भवनमध्ये लागलेल्या आगीची चौकशी होणार, असेही अजित पवार यांनी सांगितले.

# संपादकीय...

# 'आप'धर्माचा विजय!



संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक

दिल्ली विधानसभेचा दर्जा हा मोठ्या महानगरपालिकेपेक्षा अधिक नाही. पण या निवडणुकीतही भाजपने आपली सर्व ताकद पणास लावली. विवेकास रजा देऊन विखारी प्रचार केला. परंतु मतदारांनी सकारात्मक पर्याय निवडला..

लोकशाही राष्ट्राच्या इतिहासात अशा काही निवडणुका येतात की ज्यांत जनतेचा राजकीय विवेक पणाला लागलेला असतो. दिल्ली विधानसभा निवडणूक ही अशी होती. तीत, सुमारे २७५ खासदार, डझनभर आजी-माजी मुख्यमंत्री, जवळपास संपूर्ण केंद्रीय मंत्रिमंडळ, यांचे नेतृत्व करायला साक्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सूत्रसंचालकपदी गृहमंत्री अमित शहा, मदतीला दिल्ली पोलीस आणि कणाहीन निवडणूक आयोग इतके सारे हाताशी असूनही 'आम आदमी पक्षा'ने मदमस्त भारतीय जनता पक्षाला किरकोळीत धूळ चारली. ही दिल्लीकरांसाठी अभिमानास्पद बाब. निवडणूक प्रचारात प्रचंड विष आणि विखार कालवण्याचा प्रयत्न करूनही दिल्लीतील मतदारांचा विवेक ढळला नाही हे विशेष. ही निवडणूक अनेकार्थांनी महत्त्वाची आहे. कोणत्याही निवडणुकीत एखादा पक्ष जिंकतो आणि एखादा हरतो इतक्या मर्यादित अर्थाने भाजपच्या पराभवाची आणि म्हणून आपच्या विजयाची मीमांसा करता येणार नाही. या निवडणुकीतील 'आप'च्या विजयाच्या आकारापेक्षा भाजपच्या पराभवाची भव्यता अधिक लक्षणीय आणि दूरगामी परिणाम करणारी आहे. म्हणून ती समजून घ्यायला हवी.

याचे कारण मावळते पक्षाध्यक्ष अमित शहा यांच्या अध्यक्षपदाचा सुरुवातीचा काळ वगळता भाजपला एकाही राज्यात निर्विवाद विजय मिळवता आलेला नाही, हे इतकेच नाही. भाजपने आपली सर्व ती ताकद या निवडणुकीत पणास लावली होती आणि तरीही त्या पक्षाचा पराभव झाला हेदेखील नाही. जवळपास प्रत्येक मतदार कुटुंबामागे एक कार्यकर्ता लावून आणि प्रचाराचा कानठळी धडाका करूनही मतदारांनी भाजपकडे दुर्लक्षच केले ही बाबही तितकी महत्त्वाची नाही. हे सर्व मुद्दे खरेच. पण त्यापेक्षाही खरा आणि डोळ्यात भरणारा मुद्दा म्हणजे कोणत्या निवडणुकीत किती ताकद मदानात उतरवायची या आणि लढाईनुसार शस्त्र आणि अस्त्रेही बदलावी लागतात या शहाणपणास भाजपने पूर्णांशाने दिलेली तिलांजली. चकमक, संघर्ष, लढाई, युद्ध आणि महायुद्ध असे काही प्रकार असतात हे भाजपच्या गावीही नाही. त्यामुळे छोटेखानी निवडणुकीतही हा पक्ष बेंबीच्या देठापासून रणदुंदुभी छेडतो. आणि म्हणून अधिकाधिक हास्यास्पद ठरतो. कितीही व्यापक अर्थाने पाहू गेल्यास दिल्ली विधानसभेचा दर्जा हा एखाद्या महानगरपालिकेपेक्षा अधिक नाही. पण या निवडणुकीतही भाजपने आपली सर्व ताकद पणास लावली आणि खुद्द पंतप्रधान मोदी हे शिंगे दुमडून वासरात शिरले. याची गरज नव्हती. तथापि असे करावे लागते यातच भाजपची असहायता दिसून येते. त्या पक्षाच्या हाती एकमेव शस्त्र आणि एकमेवच अस्त्र. लढाई झारखंडची असो की मुंबईची किंवा दिल्लीची. भाजप-हाती दुसरे शस्त्रास्त्रच नाही. अशा वेळी अधिक शहाणपणा दाखवण्याऐवजी हा पक्ष उरला-सुरला विवेकही घालवून बसतो.

आणि अधिकाधिक धर्मवादी आणि अधिकाधिक विखारी होत जातो. दिल्ली विधानसभा निवडणुकांत हेच दिसून आले. देश के गद्दारों को.. पासून शाहीनबागेस विजेचा धक्का देण्याची भाषा करण्यापर्यंत जे जे अभद्र ते ते सारे भाजपने या निवडणुकीत करून पाहिले. त्यामुळे ही निवडणूक या देशातील आतापर्यंतची सर्वात गलिच्छ निवडणूक म्हणून नोंदली जाईल. ही बाब अधिक गंभीर ठरते कारण केंद्रात दणदणीत बहुमताने सत्तेवर असलेल्या पक्षाने हा असा असांसदीय मार्ग अवलंबण्याची गरज नव्हती. हे असे करण्यात खुद्द पंतप्रधान मोदी हेदेखील मागे राहिले नाहीत, ही बाब क्लेशकारक आणि चिंता वाढवणारी. खरे तर बेजबाबदारपणे बरळणाऱ्या आपल्या कनिष्ठांचे कान मोदी यांनी उपटायला हवे होते. ते राहिले बाजूलाच. उलट मोदीच खुद्द या धुळवडीत उतरले. ही बाब दुर्लक्ष करण्याजोगी नाही. याचे कारण त्यातून आपल्या नेत्यांचे लक्ष वेधून घ्यावयाचे असेल तर असेच काही आचरट बोलावे लागते असा संदेश जातो आणि मग स्पर्धा अधिकाधिक बेशरमपणाची होत जाते. अनुराग ठाकूर ते स्वत:चा एक मतदारसंघही निर्माण करू न शकलेले प्रकाश जावडेकर व्हाया परवेश वर्मा यांनी या निवडणुकीत तोडलेले तारे हेच दर्शवतात. 'या निवडणुकीत आपचा विजय झाला तर शाहीनबाग निदर्शक घराघरांत घुसून महिलांवर अत्याचार करतील', 'केजरीवाल हे नटवरलाल', 'केजरीवाल यांचे दहशतवाद्यांशी संबंध आहेत आणि त्याचे पुरावे आमच्या हाती आहेत' ही वा अशी अनेक विधाने भाजपने विवेकास रजा दिल्याचीच द्योतक ठरतात.

अशा या निवडणुकीत ताठ उभे राहणे हे निश्चितच अरविंद केजरीवाल यांच्या राजकीय शहाणपणाचे दर्शन घडवणारे आहे. समोर अमानुष ताकदीचे प्रच्छन्न प्रदर्शन करणारा स्पर्धक असताना शहाणपणाच्या मार्गावर राहणे अवघड असते. केजरीवाल यांनी हे अवघड आव्हान लीलया पेलले. त्यात त्यांचे राजकीय चातुर्य म्हणजे निवडणुकीस धार्मिक वळण देण्याचे भाजपचे सर्व प्रयत्न त्यांनी अनुल्लेखाने मारले. दिल्लीत शाहीनबागेचे रणकुंड धगधगत असताना आणि त्यात आग ओतण्याचे काम भाजप करीत असताना केजरीवाल यांनी स्वत:स त्याची धग लागू दिली नाही. भाजपचा सर्वतोपरी प्रयत्न होता तो निवडणूक हिंदू विरुद्ध मुसलमान अशा दुभंगावर व्हावी यासाठी. केजरीवाल आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी स्वत:स भाजपच्या सापळ्यापासून सातत्याने वाचवले. अनुच्छेद ३७० रद्द करण्याचा मुद्दा असो वा नागरिकत्व चाचणीचा. अशा मुद्द्यांना हाताळण्याचा आपने दाखवून दिलेला मार्ग काँग्रेसनेही अनुकरण करावा असा आहे. केजरीवाल यांचा सातत्याने प्रयत्न होता तो निवडणूक दिल्ली विकासाच्या मुद्द्याभोवतीच फिरावी. त्या आघाडीवर केजरीवाल यांचे यश निश्चितच डोळ्यात भरणारे आहे. मोहल्ला क्लिनिक ते सरकारी शाळा या आघाडीवर केजरीवाल सरकारने निश्चितच नावीन्यपूर्ण प्रयोग केले. त्याची पावती सामान्य दिल्लीकराच्या बोलण्यातून येत असते. त्यामुळे भाजपसाठी ही निवडणूक विकास या मुद्द्यावर लढणे सोयीचे नव्हते. अशा वेळी खरे तर स्वत:स खरा विकासवादी मानणाऱ्या भाजपने विकासाचा पर्यायी कार्यक्रम आणि नेतृत्व उभे करणे आवश्यक होते. त्या आघाडीवरही भाजपचा नन्नाचाच पाढा. त्यात भाजपचा नेतृत्वाचा स्थानिक चेहरा म्हणावा तर मनोज तिवारी, हा. म्हणजे आनंदच. अशा वेळी कोणताही सकारात्मक निवडणूकमुद्दा हाती नसल्याने भाजप अधिकाधिक धर्मवादी होत गेला. त्या पक्षाचे हे गणित पूर्ण चुकले.

त्याचे 'श्रेय' काँग्रेस पक्षासही द्यायला हवे. आपच्या या धुव्वाधार विजयाचे रहस्य काँग्रेसच्या धूळधाणीत आहे. आधीच मुळात काँग्रेस हरवलेली आहे. या निवडणुकीत त्यामुळे तो पक्ष अधिक जोमाने उतरता तर आपचीच मते खाता. भाजपची तीच आशा होती. भाजपने शाहीनबाग आदी मुद्दे तापवले ते काँग्रेसला टवटवी यावी याच उद्देशाने. काँग्रेसने या निवडणुकीत सुरुवात तर जोमात केली. पण मधेच या पक्षाने मान टाकली. इतका शहाणपणा राहुल गांधी यांनी दाखवला हे तसे आश्चर्यच. अर्थात हे ठरवून झाले की काँग्रेसच्या अंगभूत निर्नायकतेमुळे घडले याबाबत संभ्रम असू शकतो. पण ज्या पद्धतीने काँग्रेसने मध्यातून निवडणूक सोडून दिली ते आपच्या पथ्यावर पडले. काँग्रेसने ७०पैकी ६३ मतदारसंघांत आपली अनामतही गमावली, हे 'राष्ट्रीय' म्हणवून घेणाऱ्या पक्षासाठी उल्लेखनीयच म्हणायचे.

हा निवडणूक निकाल हा आगामी निवडणुकोन्मुख राज्यांसाठी आणखी एक धडा आहे. समोर ठसठशीत पर्याय असेल तर भाजपच्या धर्मवादी भूमिकेचा लीलया पराभव करता येऊ शकतो, हा तो धडा. जम्मू-काश्मीरचा अनुच्छेद ३७० रद्द केल्यानंतरच्या पहिल्या निवडणुकीत प्राधान्याने 'फौजी' हरयाणा भाजपच्या बाजूने गेला नाही. महाराष्ट्र, झारखंड आदी राज्येही भाजपच्या हातून गेली. आता घोडामदान आहे ते बिहारचे. दिल्लीतील दारुण पराभवामुळे भाजपस बिहारात नितीशकुमार यांच्यासमोर कान पाडून बसावे लागेल. नंतर आहेत पश्चिम बंगाल, तमिळनाडू आदी विधानसभा निवडणुका. दिल्लीपासून भाजपने काही बोध घेतला नाही तर आगामी निवडणुकांचे निकालही असेच काहीसे लागू शकतात.

# मेट्रो ३ चे सत्य - भूयारी रेल्वे, 'मौत का कुवा'

## मुंबईकरांनो वेळीच जागे व्हा

**ॲड. गिरीश राऊत**

मुंबईत भूयारी रेल्वेसाठी आरेच्या जंगलातील कारशेडवरून वाद पेटला आहे. पण या प्रकल्पामुळे राहत्या इमारतीदेखील उखडल्या जात आहेत याकडे दुर्लक्ष होत आहे. माहीममधील 'लक्ष्मी' व 'मेहेर मंझिल' दोन इमारतींतील नागरिक दि. ९ नोव्हेंबर पासुन त्यांच्या इमारती खचल्याने घराबाहेर आहेत. हजारो इमारतींचा पाया या प्रकल्पाने खिळखिळा केला आहे. यात हुतात्मा चौकातील सिध्दार्थ कॉलेज, पेटीट वाचनालय चर्चगेटची रेल्वेची इमारत इ. सुप्रसिद्ध ऐतिहासिक वारसा म्हणून नमूद केलेल्या अनेक इमारती आहेत.

अशा हजारो इमारतींना त्याच जागी पुन्हा बांधणे भूयारी रेल्वेबाबतच्या निर्बंधांमुळे शक्य नाही. पण हे लपवले जात आहे. कधीही छोटा-मोठा भूकंप झाल्यास किंवा न झाला तरी या इमारती कोसळतील. यामुळे एकतर यातील नागरिक किंवा भूयारातील शेकडो, हजारो प्रवासी मृत्यू पावले तरी मेट्रोला त्याची पर्वा नाही, हे त्यांच्या वर्तनातुन स्पष्ट झाले आहे.

आरे जंगलातील झाडे मेट्रो ३ भूयारी रेल्वे प्रकल्पासाठी तोडली. या प्रकल्पाने आतापर्यंत माहीमच्या खाडीतील जंगलासह सुमारे २०००० झाडे तोडली. आरेतील झाडे तोडण्यास मोठा विरोध झाला. शिवसेनेसह काही पक्षही त्या विरोधात सहभागी झाले. मेट्रो यार्ड आरेत नको असे म्हणाले.

मेट्रो रेल्वे करणाऱ्या 'एम एम आर सी एल' कडून असा प्रचार होत आहे की, 'तुम्हाला आरेतील जंगल हवे असेल तर भूयारी रेल्वे गमावाल'. मुंबईच्या वाहतुकीचा प्रश्न सोडवण्यात अडथळा ठराल.

मुंबईचा वाहतुकीचा प्रश्न सुटावा असे सर्वांना वाटत असल्याने या ब्लॅकमेलिंगला झाडे तोडण्यास विरोध करणारे पक्ष व वृक्षप्रेमीही बळी पडत आहेत असे दिसते.

या प्रकल्पाबाबत एम एम आर सी एल ने आतापर्यंत खूप खोटा प्रचार केला. आता असा प्रचार चालू आहे की, मोठ्या प्रमाणात जाहीरातदार पुढे येत आहेत. मोठ्या विकासकांना आपल्या संकुलांमधून मेट्रो स्टेशनात थेट प्रवेशाची सोय हवी आहे. या सर्व वावड्या आहेत.

**वास्तव काही वेगळे आहे. ते आपण पाहू.**

१) माहीममधे मेट्रो ३ च्या कामामुळे 'लक्ष्मी बिल्डिंग' व 'मेहेर मंझिल' या दोन इमारतींचा पाया खचला आहे. दि. ९ नोव्हेंबर २०१९ रोजी मध्यरात्री भयंकर हादरे बसल्यामुळे या इमारतीतील रहिवासी आहे त्या स्थितीत बाहेर पळाले, ते तेव्हापासुन बाहेरच आहेत. त्यांना मेट्रो कडून रोजचे खाण्याचे व राहण्याचे पैसे दिले जात आहेत. स्ट्रक्चरल इंजिनिअरांचे लेखी मत आहे की, या इमारतींत राहू नये. त्या कधीही पडू शकतात. त्या पाडाव्या. या इमारती त्या मध्यरात्री पडल्या असत्या तर त्या दुर्घटनेत शेकडो माणसे मृत्युमुखी पडली असती.

माहीममधे मेट्रो ने ६६ इमारतींची यादी बनवली होती, ज्यांना धोका पोहचू शकतो. असा प्रकार मुंबईतील हजारो इमारतींबाबत या प्रकल्पामुळे झाला आहे. प्रकल्पातील २७ स्थानके व इतर कामांत केलेल्या खोदकामाने पायाला लागुन खोल बांधकाम करून या इमारतींना हादरे दिले आहेत व पाया खिळखिळा केला आहे. यांच्यावर माहीमच्या इमारतींप्रमाणे येत्या काही वर्षांत कधीही संकट ओढवेल.

२) हा प्रकल्प मुंबईच्या उज्वल भविष्यासाठी आहे, असा खोटा प्रचार होत आहे. वास्तवात मेट्रो ३ ने मुंबईसाठी आधीच अनेक समस्या निर्माण केल्या आहेत. हा प्रकल्प पूर्ण झाल्यास, ऐतिहासिक भीषण दुर्घटना घडवणार आहे. त्यानंतर तो वापरात येणार नाही. कायमचा कुलुप लावून बंद ठेवला जाईल व मुंबईसाठी एक 'लांच्छन' म्हणून ओळखला जाईल. पुढील माहिती प्रकल्पाच्या अधिकृत अहवालावर आधारित आहे. त्यातुन भविष्यात काय वाढून ठेवले आहे ते लक्षात येईल.

अ) या प्रकल्पात मुंबईचे अधिकात अधिक तापमान धरावयास हवे. पण 'सरासरी उच्चतम' अशी टूम काढली आहे. ते ३२.२ष्टसे धरले आहे. प्रत्यक्षात उन्हाळ्यात बहुतेक दिवशी तापमान ४० ते ४५° से पर्यंत वर जाते. या वेळी भूयारातील तापमान यापेक्षा जास्त असणार आहे. जागतिक तापमानवाढीमुळे दरवर्षी तापमान वाढत चालले आहे. या प्रकल्पाबाबत अनेक दुर्घटनांची शक्यता आहे. पण आपण साधी वाटणारी वीज जाण्याची शक्यता पाहू. ४० ष्टसे च्या वर तापमान असताना वीज गेली व पर्यायी व्यवस्था बंद पडली, जो आपला नेहमीचा अनुभव असतो, तर अशावेळी भूयारात मिट्ट काळोख असेल, तुम्ही सुमारे ७५ ते १२० फूट खोलीवर उकडुन, भाजून निघत असाल. कोणतीही मदत पोहचू शकणार नाही. या प्रकल्पात यामुळे एकाच वेळी शेकडो किंवा हजारो माणसे मृत्युमुखी पडणार आहेत. जे प्रकल्पकर्ते खोटे तापमान दाखवतात, ते तसे करतात, कारण खऱ्या तापमानाचा विचार केल्यास प्रकल्प करताच आला नसता.

हा प्रकल्प करताना नेहमी युरोप अमेरिकेचे उल्लेख होतात. तेथील तापमान शून्याजवळ असण्याच्या काळात, त्यांनी असे प्रकल्प केले. आता जगाचे तापमान दरवर्षी वाढत आहे. त्यामुळे मानवजात व जीवसृष्टीचे उच्चाटन सुरू झाले आहे. ऑस्ट्रेलियातील वणव्यांमधे ते स्पष्ट झाले आहे. अशावेळी तापमानवाढीचा वेग वाढवणारा असा प्रकल्प करताच कामा नये. परंतु प्रकल्प करणारांना मुंबईचेच तापमान लपवायचे आहे तिथे ते पृथ्वीच्या तापमानाची का चिंता करतील? मरोनात का मुंबईचे लोक. कंपन्या प्रकल्पातुन प्रचंड पैसा कमावून निघुन जातील. हेच वरळी वांद्रे सी लिंकबाबत घडले. 'यु पी स्टेट ब्रिज कॉर्पोरेशन' सागरात गरज नसताना भराव करून निघुन गेले. त्याचा परिणाम म्हणून मुंबईची ४ हजार माणसे २६ जुलै च्या महापूरात बुडून मेली. तेव्हा सी लिंकचा महापूरातील वाटा लोकांना समजला नाही. त्यामुळे हा गुन्हा पचून गेला. परंतु या प्रकरणी तसे निसटून जाता येणार नाही.

ब) माहीमच्या इमारतींचा पाया खचण्यास पाण्याचा शिरकाव कारण आहे. हा सागराचा शिरकाव आहे. ही अत्यंत गंभीर बाब आहे. माहीम (प्रभादेवी, दादर, माहीम) हे वाळूचे बेट आहे. मेट्रो प्रकल्प करताना मातीची आवश्यक ती परिक्षणे केलेली नाहीत. रेल्वे ही सार्वजनिक सेवा असल्याचे कारण पुढे करून, सार्वजनिक सुनावणी टाळण्यात आली. नाहीतर या बाबी पुढे आल्या असत्या. हे भीषण स्वरूपाच्या दुर्घटनेला आमंत्रण देणे आहे.

याचा संबंध भूकंपप्रवणतेशी देखील आहे. मुंबईची मूळ बेटे म्हणजे 'कुलाबा ते माहीम - सायन' हा भाग ४ क्रमांकाच्या अतिधोकादायक प्रवर्गात येतो. मुंबईच्या मूळ बेटांपासुन ते रत्नागिरी असा हा किनारपट्टीचा भाग, झोन ४ मधे आहे. तरीही त्याला 'मध्यम धोकादायक झोन ३' दाखवून प्रकल्प रेटला जात आहे. हे जनतेच्या जीवाशी खेळणे आहे. भूकंपाच्या धक्क्याने भूयारी रेल्वे खचू शकते. जमिनीअंतर्गत वेगवेगळे थर आहेत. खडकांच्या थरांत लाव्हा रसाच्या राखेचे थर आहेत. त्यांना पाणी लागल्यास ते दबून जातात. सागर आत शिरू शकतो. आग लागू शकते. खिळखिळया झालेल्या इमारती खचू शकतात. दुर्घटना कधीही घडू शकतात. यामुळे हा प्रकल्प 'मौत का कुवा' ठरणार आहे.

३) कफ परेड ते सीप्झ हे अंतर फक्त ६० मिनिटात कापणार असा दावा मेट्रो ३ ने झाडे तोडल्यावर संतापलेल्या मुंबईकरांना भुलवण्यासाठी वर्तमानपत्रात दिलेल्या जाहिरातीत लेखी स्वरूपात केला आहे. हे असत्य आहे.

पश्चिम रेल्वेवर चर्चगेट ते बोरिवली हे साधारण समान अंतर (३३.५ - ३४ किमी.) आहे. यात २१ स्थानके आहेत. ही रूंद गेजची (ब्रॉडगेज) रेल्वे आहे. जास्त स्थैर्य आहे. त्यामुळे वेग आहे. जवळजवळ सरळ रेषेत हा मार्ग आहे. दरवाजे उघडे आहेत. धीम्या लोकलला या अंतरासाठी सुमारे ६५ मिनिटे लागतात. एका स्थानकासाठी ३ मिनिटे असा हा वेळ आहे.

याची मेट्रो ३ शी तुलना करू. मेट्रो ३ ब्रॉडगेज नाही. या मार्गावर २७ स्थानके आहेत. मार्ग वळणावळणाचा आहे. पाच ठिकाणी तर अत्यंत बाकदार (९०ष्ट) वळणे आहेत. स्थानके जवळ जवळ म्हणजे एकमेकांपासुन कमी अंतरावर आहेत. त्यामुळे गाडीला वेग घेताच येणार नाही. तुलनेने स्थैर्य कमी आहे. दरवाजे स्वयंचलित असणार आहेत. त्यांना उघडण्या- बंद होण्यास वेळ लागतो.

अशा स्थितीत पश्चिम रेल्वेवर जर एक तासापेक्षा जास्त वेळ लागतो तर मेट्रो- ३, एका तासात प्रवाशांना नेईल हे शक्यच नाही. मेट्रो- ३ चा शेड्यूल्ड वेग हा प. रेल्वेच्या निम्म्याहून कमी असणार आहे. या सगळ्याचा अर्थ मेट्रो ३ भूयारी रेल्वेला कफ परेड ते सीप्झ हे अंतर कापण्यास एका स्टेशनास प. रेल्वेच्या किमान दुप्पट म्हणजे ६ मिनिटे वेळ लागेल. म्हणजे मेट्रो ३ भूयारी रेल्वेला २७x६=१६२ मिनिटे, म्हणजे दोन तास बेचाळीस मिनिटे वेळ लागेल. स्पष्ट आहे की, मुंबईतील नागरिक एवढा वेळ एवढ्या छोट्या अंतरासाठी देऊ शकत नाही. आणि ही काही माथेरानची मिनी ट्रेन नाही की बसल्या बसल्या सृष्टीसौंदर्य दिसणार!

थोडक्यात मुंबईकर या रेल्वेचा वापर करणार नाहीत.

४) मेट्रो ३ भूयारी रेल्वे प्रकल्प प्रदूषण कमी करणार नाही. :

हा प्रकल्प चालवण्यासाठी कोळसा जाळून केलेली वीज (औष्णिक) वापरणार आहेत. रोज १९ तास रेल्वे चालली आणि १५० मेगावॅट वीज वापरली व वाहून आणण्यातील गळती ३०ï धरली तर या प्रकल्पामुळे औष्णिक विद्युत प्रकल्प प्रत्येक दिवशी ४०९५ मेट्रिक टन आणि एका वर्षात १४,९४,६७५ मे. टन फक्त कार्बन डायऑक्साईड वायूचे उत्सर्जन करेल. इतर, हवा व पाण्यातील प्रदूषण, राख इ. आणि प्रचंड पाणीवापर वेगळा.

हे वायूप्रदूषण मुंबईतील 'बेस्ट बस' व 'टॅक्सी - रिक्षा' या सार्वजनिक वाहनांच्या एकत्रित प्रदूषणापेक्षा खूप जास्त आहे.

भूयारामुळे वायुवीजन व प्रकाश यांची व्यवस्था करण्यास अधिक वीज निर्माण करणे आवश्यक होते. पृथ्वीची तापमानवाढ अपरिवर्तनीय झाली आहे. जीवसृष्टी नष्ट होणे सुरू झाले आहे. अशावेळी तापमानात भर घालणारा ऊर्जावापर कमी करण्याची गरज आहे. त्याऐवजी ऊर्जेची अशी उधळपट्टी करणारा अनावश्यक व धोकादायक प्रकल्प हाती घेणे हा बेजबाबदारपणा आहे. जर्मनीसारख्या मोटारी व मेट्रोच्या संशोधक देशाने आता त्यापासुन परावृत्त करण्यासाठी दीड वर्षांपूर्वी उत्कृष्ट सार्वजनिक बस सेवा विनाशुल्क केली. कोळसा जाळून वीज बनवणारी केंद्रे बंद करणे सुरू केले. येथे मात्र, नगण्य जागा व्यापुन सर्वाधिक सेवा देणारी बस चालू राहिली तर मेट्रोने व मोटारीने कुणी जाणार नाही म्हणून सव्वाशे वर्षांची उत्कृष्ट बेस्ट बस सेवा बंद पाडत आहेत व अधिकाधिक कोळसा जाळत आहेत.

खुद्द शहरातील कोंडी व प्रदूषण वाढणार आहे कारण प्रत्येक स्थानकात ५ ते ६ येण्या- जाण्याचे मार्ग हे रस्ते व फूटपाथची जागा व्यापणार आहेत. शिवाय भूयारांत निर्माण होणारे दूषित विषारी वायू ठिकठिकाणी उंच धुराडी बांधून सोडण्यात येणार आहेत.

**(क्रमश:)**

# शासकीय कर्मचाऱ्यांनी सहानुभूतीचा दृष्टिकोण ठेवणे आवश्यक

## - जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर

**ठाणे** – शासकीय सेवेत असतांना प्रत्येक कर्मचाऱ्याने सहानुभूती आणि मदतीची भावना ठेवून काम करावे असे आवाहन जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर यांनी केले.

ठाणे जिल्ह्यातील १० मयत कर्मचाऱ्याच्या वारसांना शासकीय सेवेत सामावुन घेण्यात आले आहे. या सर्व वारसांना नियुक्तीपत्र जिल्हाधिकारी यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी वैदेही रानडे,निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.शिवाजी पाटील, उपजिल्हाधिकारी अभिजित भांडे,चिटणीस राजेंद्र चव्हाण आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री.नार्वेकर यांनी कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक बाबींचा तातडीने निपटारा करण्याच्या सुचना निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. शिवाजी पाटील यांना दिल्या होत्या. त्यानुसार सर्व यंत्रणेने प्राधान्याने या सर्व बाबींची पुर्तता केली.

जिल्हाधिकारी ठाणे आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांचे स्थायी आदेश,आश्वसित सेवा योजनेअंतर्गत आश्वासित प्रगती योजनेचे १०,२०,३०, वर्षाचे लाभ पात्र कर्मचाऱ्यांना देण्यात आले.

कर्मचाऱ्यांचे प्रश्न तातडीने सोडविल्याबदल ठाणे जिल्हा महसूल कर्मचारी संघटने जिल्हाधिकाऱ्यांचे आभार मानले. जिल्ह्यातील सर्व कर्मचाऱ्यांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून चांगले काम करावे असे आवाहन श्री. नार्वेकर यांनी या वेळी केले .

# कर्जाच्या बदल्यात कोटयवधीची फसवणूक करणाऱ्या टोळीला ठाणे पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण शाखेने अटक केली अटक



**ठाणे :** सहा कोटी रुपयांच्या कर्जाच्या बदल्यात एका बांधकाम व्यावसायिकाकडून सुरक्षा ठेव म्हणून दोन कोटी रुपये घेऊन पलायन करण्याच्या प्रयत्नात असलेल्या एका टोळीला ठाणे पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण शाखेने अटक केली. विनोदकुमार झा (४८) आणि अमितकुमार यादव (२६) अशी अटकेत असलेल्या आरोपींची नावे असून पोलिसांनी त्यांच्याकडून दोन कोटी रुपये जप्त केले आहेत.

मुंबईमध्ये एक बांधकाम व्यावसायिक राहतात. त्यांना व्यवसायासाठी ६ कोटी रुपयांचे कर्ज हवे होते. याच दरम्यान, त्यांची ओळख विनोदकुमार याच्यासोबत झाली. त्याने बांधकाम व्यावसायिकाला कर्ज काढून देतो तसेच बँकेच्या एका अधिकाऱ्याला भेटवून देतो अशी बतावणी केली. बुधवारी बांधकाम व्यावसायिकाला विनोदकुमारने ठाणे रेल्वे स्थानक परिसरात भेटण्यासाठी बोलावले. तसेच येताना कर्जाच्या रकमेची सुरक्षा ठेव म्हणून २ कोटी रुपये आणण्यास सांगितले. बांधकाम व्यावसायिक ठाणे रेल्वे स्थानक परिसरात आले असता, विनोदकुमार आणि त्याचा सहकारी अमितकुमारही त्या ठिकाणी आले. या दोघांनी बांधकाम व्यावसायिकाकडे असलेले २ कोटी रुपये घेतले. हे पैसे बँकेत भरण्यास नेतो आणि आर.टी.जी.एस. पावती आणतो असे सांगून दोघांनी त्या ठिकाणाहून पलायन केले. मात्र, उशिरापर्यंत हे दोघेही न परतल्याने गुरुवारी बांधकाम व्यावसायिकाने याप्रकरणी ठाणेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

या प्रकरणाचा समांतर तपास ठाणे गुन्हे अन्वेषण शाखेच्या युनिट एककडून सुरू होता. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे आणि पोलीस निरीक्षक रणवीर बयेस यांच्या पथकातील साहाय्यक पोलीस निरीक्षक अविराज कुराडे, समीर अहिरराव आणि संदीप बागूल यांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला. दरम्यान, यातील आरोपी हे पवन एक्स्प्रेसने बिहारच्या दिशेने जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. यानंतर पोलिसांनी रेल्वे पोलीस आणि रेल्वे सुरक्षा दलाशी संपर्क साधून विनोदकुमार आणि अमितकुमार या दोघांना मध्य प्रदेशातील खंडवा येथून ताब्यात घेतले. त्यांची चौकशी केली असता पोलिसांना त्यांच्याकडून दोन कोटी रुपये जप्त केले. याप्रकरणी पोलिसांनी दोघांना अटक केल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# दरवाढ म्हणजे वीजचोरी व गळतीची ग्राहकांकडून वसुली

**वसई :** महावितरणने वीज आयोगाला सादर केलेल्या ६० हजार ३१३ कोटी रुपयांच्या वीज दरवाढीच्या प्रस्तावाला वसईतील जनता दलाच्या कार्यकर्त्यांनी नवी मुंबई वीज आयोगाकडील सुनावणीवेळी जोरदार विरोध केला आहे. वीजचोरी, वीज गळती आणि भ्रष्टाचाराची वसुली या दरवाढीच्या माध्यमातून प्रामाणिक ग्राहकांकडून केली जात असल्याचा आरोपही या वेळी संघटनेकडून करण्यात आला.

महावितरणने वीज आयोगाला सादर केलेल्या ६० हजार ३१३ कोटी रुपयांच्या वीज दरवाढीच्या प्रस्तावाला जनता दलाचे कुमार राऊत, जॉन परेरा, पायस मच्याडो आदींनी विरोध केला आहे. महावितरणचा वीज दरवाढीचा प्रस्ताव फेटाळून लावण्याची मागणी जनता दलाने आयोगाकडे केली आहे. महावितरणने पुढील पाच वर्षांत ६० हजार ३१३ कोटी रुपयांच्या वीज दरवाढीचा प्रस्ताव वीज आयोगापुढे सादर केला असता ही दरवाढ १ ते ५ टक्के इतकीच आहे, असा दावा जरी महावितरणने केला असला तरीही जनता दलाने आहे मात्र महावितरणचा हा दावा फसवा असल्याचा गंभीर आरोप केला आहे.

सध्याचा सरासरी वीजदर प्रति युनिट जवळपास ६.५० रुपये इतका आहे, तर २०२०-२१ मधील हा दर ७.२५ रुपये प्रति युनिट म्हणजेच ७.५० टक्केपेक्षा अधिक दरवाढ आहे. हीच वाढ २०२४-२५ मध्ये प्रति युनिट ८.२५ म्हणजेच सध्याच्या दराच्या तुलनेत तब्बल २० टक्क्यांपेक्षा जास्त होणार आहे.

# पालघर जिल्ह्यात महाविकास आघाडीचे वर्चस्व

पालघर जिल्ह्यातील आठ पंचायत समिती मधील सभापती व उपसभापती च्या निवडणुकीत नुकत्याच झालेल्या निवडणुकीत पालघर, डहाणू, वाडा विक्रमगड व मोखाडा पाच ठिकाणी शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसच्या सहकार्याने महा विकास आघाडीच्या माध्यमातून सत्ता प्रस्थापित करण्यात आली आहे. तर जव्हार व वसई येथे शिवसेना व भाजपमध्ये अंतर्गत समझोता झाल्याचे दिसून आले असून तलासरी येथे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे निर्विवाद बहुमत असल्याने त्या पक्षाचा सभापती व उपसभापती निवड झाली आहे.

जिल्ह्यातील आठ पंचायत समितीमध्ये सभापती व उपसभापती पदासाठी निवडणूक घेण्यात आली होती. मात्र डहाणू व वसई तालुक्या व्यतिरिक्त इतर सर्व ठिकाणी निवड बिनविरोध झाल्या. पालघर, वाडा, वसई व मोखाडा या चार ठिकाणी शिवसेनेचे तर डहाणू व विक्रमगड येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सभापती निवडून आले आहे. तलासरी मध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने १९६२ पासून सलग ५८ वर्ष लाल बावटा फडकावत ठेवला असून जव्हार येथे जिल्ह्यात एकमेव ठिकाणी भाजपाचा सभापती निवडून आला आहे. मोखाडा येथे सारिका निकम या सलग तिसऱ्यांदा सभापती पदी निवडून आल्या आहेत.

# ‘विनाअनुदानित गॅस’ सिलिंडरच्या दरात वाढ
# आता ग्राहकांना मोजावे लागणार २७७ रुपये जादा



**कोल्हापूर : तेल कंपन्यांकडून ग्राहकांना १२ अनुदानित सिलिंडरनंतर मिळणाऱ्या विनाअनुदानित सिलिंडरच्या दरात वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे जिल्ह्यात ग्राहकांना २७७ रुपये जादा देऊन सिलिंडरची खरेदी करावी लागणार आहे. या निर्णयामुळे सर्वसामान्य व मध्यमवर्गीयांचे महिन्याचे गणित कोलमडणार आहे. या नवीन दरवाढीची अंमलबजावणी गॅस वितरकांकडून सुरू करण्यात आली आहे. सर्वसामान्य ग्राहकांमधून या दरवाढीबद्दल संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत.**

जागतिक बाजारपेठेत इंधनदरात वाढ झाल्याचे कारण सांगून सार्वजनिक क्षेत्रातील तेल कंपन्यांनी विनाअनुदानित सिलिंडरच्या दरात १४४ रुपये ५० पैशांची वाढ केली आहे. यामुळे १३ पासूनची पुढील विनाअनुदानित सिलिंडर ग्राहकाला ८४५ रुपये ५० पैशांनी खरेदी करावी लागणार आहेत. अनुदानित सिलिंडरचा दर सध्या ५६८ रुपये इतका आहे.

सरासरी याच दराने ग्राहकाला १ एप्रिल ते ३१ मार्च या कालावधीत १२ सिलिंडर मिळतात. यावर कोणतीही दरवाढ झालेली नाही; परंतु ‘अनुदानित’चा कोटा संपून तेराव्या सिलिंडरपासून जे सिलिंडर खरेदी करावे लागते, त्याला ‘विनाअनुदानित’चा दर लागू होतो. त्यामध्येच मोठ्या प्रमाणात वाढ करण्यात आली आहे. जवळपास गेल्या सहा वर्षांतील ही सर्वांत मोठी वाढ असल्याचे दिसून येत आहे.

या नवीन दरानुसार गॅस वितरकांनी अंमलबजावणी सुरू केली आहे. चारजणांचे कुटुंब असलेल्यांना एक सिलिंडर कसेबसे महिनाभर जाऊ शकते; परंतु एखाद्या कुटुंबात चारपेक्षा अधिकजण असल्यास हा कालावधी कमी होऊन तो २० ते २५ दिवसांवर येतो. त्यामुळे आर्थिक वर्षातील १२ अनुदानित सिलिंडरचा कोटा लवकरच संपतो. त्यानंतर विनाअनुदानितच्या माध्यमातून गॅस सिलिंडर खरेदी करावे लागते. त्याची झळ संबंधितांना बसते. विनाअनुदानितचा दर पूर्वी ६९९ इतका होता. १२ फेब्रुवारीला दरवाढीनंतर तो ८४५ रुपये झाला आहे. प्रत्यक्षात विनाअनुदानित सिलिंडरची १४४ रुपये ५० पैसे इतकी दरवाढ झाली असली तरी, सध्या अनुदानित सिलिंडरसाठी असलेल्या ५६८ रुपयांच्या तुलनेत विनाअनुदानितसाठीचा वाढलेला दर हा २७७ रुपये आहे. यामुळे सर्वसामान्य व मध्यमवर्गीय ग्राहकांचे अक्षरश: कंबरडे मोडले आहे. केंद्र सरकारने यात हस्तक्षेप करून या निर्णयाबाबत फेरविचार करण्यास भाग पाडावे, असा सूर उमटत आहे.

# हुक्का पार्लसविरोधात सामाजिक संघटनांकडून कारवाईची मागणी

## कर्मचाऱ्यावर विषप्रयोगाची धक्कादायक घटना



**वसई :** वसईतील शहरी भागात सुरू असलेल्या एका हुक्का पार्लरवर मागील आठवड्यात वसई पोलिसांनी धाड टाकून कारवाई केली होती. या हुक्का पार्लरची ‘टीप’ दिल्याच्या संशयावरून एका कर्मचाऱ्यावर विषप्रयोग केल्याची धक्कादायक घटना घडल्यानंतर आता वसईतील हुक्का पार्लर्सविरोधात सामाजिक संघटनांनीही आघाडी उघडली असून चोहोबाजूंनी संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत.

राज्यात सर्वत्र हुक्का पार्लरवर बंदी असतानाही वसई-विरार शहरातील महामार्ग असो वा शहरी भागातील हॉटेल, मॉल, उपाहारगृहे आणि विविध ठिकाणी हुक्का पार्लर सुरू आहेत. पालघर पोलीस अधीक्षक व जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार करीत या हुक्का पार्लर्सवर कडक व कायमस्वरूपी बंदीची मागणी सामाजिक संघटनांनी केली आहे, अशी माहिती समीर वर्तक यांनी दिली. दरम्यान, वसई-विरार परिसरातील नवघर-माणिकपूर शहर, पापडी, वसई गाव आणि खासकरून महामार्गावरील हॉटेल आणि उपाहारगृहांमध्ये बेधडक हुक्का पार्लर आजही सुरू आहेत. याशिवाय कित्येक ठिकाणी अनधिकृतपणे हुक्का पार्लर केंद्रे उघडण्यात आली असून त्याकडे अल्पवयीन मुले आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने आकर्षित होत आहेत.

वसईतील अनेक हुक्का पार्लरमध्ये अंमली पदार्थांची छुप्या पद्धतीने विक्री होत असून यामुळे वसईची तरुण पिढी नशेच्या आहारी जात असल्याचे नागरिक सांगत आहेत. हुक्का पार्लरवर बंदीचा कायदा असला तरी कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी होत नसल्यामुळे हुक्का पार्लर चालकांचे फावले आहे, अशी खंतही महिलांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

वसईतील काही मॉलमध्ये दररोज शेकडो नागरिक खरेदी आणि करमणुकीकरिता येतात. यामध्ये महाविद्यालयीन तरुणांची संख्या मोठी असते. या मॉलमध्ये बेकायदा हुक्का पार्लर चालवले जात असून त्यामुळे महाविद्यालयीन विद्यार्थी नशेच्या आहारी जात आहेत तर काही हॉटेलमध्येही हा व्यवसाय जोरदारपणे चालवला जात आहे. परिणामी वसईतील या हुक्का समस्येबाबत आमच्याकडे तक्रारी येत आहेत. जिल्हाधिकारी तथा पोलीस अधीक्षकांना याबाबत कळवले आहे. हुक्का पार्लर चालवणाऱ्यांवर कठोर कारवाई होणे गरजेचे आहे, असे पर्यावरण संवर्धन समितीचे समीर वर्तक यांनी सांगितले. अनेक ठिकाणी हुक्कापार्लर चालकांची दादागिरी वाढू लागली असून त्यामुळे गुन्हेगारीच्या घटना वाढून कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्याच्या मुद्द्याकडे ‘हरित नैसर्गिक वैभव बचाव’चे मॅकेन्झी डाबरे यांनी वेधले. आतापर्यंत रेल्वे स्थानकालगतच्या परिसरापर्यंत मर्यादित असलेली बेकायदा हुक्का केंद्रे वसईच्या हरित पट्ट्यातही शिरकाव करू लागली आहेत.

# सामान्य माणसांच्या मनातील भावना ओळखून वेळेत न्यायदान होणं आवश्यक : मुख्यमंत्री उद्धव ठाकरे

**नाशिक : महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे नाशिक जिल्ह्याच्या दौऱ्यावर असून त्यांच्या हस्ते नाशिक जिल्हा न्यायालयाच्या नियोजित इमारतीचं भूमिपूजन करण्यात आलं. त्यावेळी बोलताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी देशातील आणि राज्यातील संथ न्याप्रक्रियेवर चिंता व्यक्त केली आहे. तसेच त्यांनी न्यायालयाच्या संथ कामावर भाष्य केलं आहे. यावेळी बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, ‘सामान्य माणसांच्या मनातील भावना ओळखून वेळेत न्यायदान व्हायला हवं. सध्याच्या परिस्थितीत जलद न्याय देण्याची गरज आहे.’**



मुख्यमंत्री उद्धव ठाकरे न्यायालयाच्या संथ प्रक्रियेबाबत बोलताना म्हणाले की, ‘काल लासलगावला एक घटना घडली. सरकारनं या घटनेचा खटला फास्टट्रॅक कोर्टात चालवू असं जाहीर केलं आहे. पण, असं म्हणणं न्यायालयाचा आपमान आहे. कारण मग जी न्यायालये काम करत आहेत. ती संथ आहेत का?, असा प्रश्न उपस्थित होतो. अशीच एक घटना दिल्लीमध्ये घडली होती. त्यामुळे संपूर्ण देश ढवळून निघाला. त्या घटनेचा खटला फास्ट ट्रॅक चालला की नाही, ते माहिती नाही. पण न्यायालयानं फाशी देऊनही अंमलबजावणी अजूनही झालेली नाही.’

उद्धव ठाकरे पुढे बोलताना म्हणाले की, ‘आजच्या घडीला जलद न्याय देण्याची गरज आहे. सामान्य जनतेच्या मनातील भावना ओळखून काम करण्याची गरज आहे. कारण, न्याय मिळण्यातील विलंबामुळे शेतकरी फासावर लटकतो. कुठे काही घडतं. सरकार तातडीनं हा खटला फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवू म्हणतं. पण, फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवू असं म्हणणं हा सुद्धा न्यायालयाचा अपमानच आहे’.

‘अनेक प्रकरणात शेतकऱ्यांना न्यायाची प्रतिक्षा असते. पण त्यांना वेळेत न्याय मिळत नाही. अशातच हताश होऊन तो स्वतःला संपवतो. अशा घटना थांबायला पाहिजेत. ब्रिटिश काळापासून चालत आलेले कायदे बदलण्याचा विचार करायला पाहिजे. यासाठी न्यायालयांनी पुढाकार घेणं आवश्यक आहे.’ असं आवाहन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी नाशिक जिल्हा न्यायालयाच्या नियोजित इमारतीचं भूमिपूजनाच्या कार्यक्रमादरम्यान बोलताना केलं आहे.

# सीएए, कलम ३७०चा निर्णय मागे घेणार नाहीः PM मोदी

**वाराणसी –** आधी कलम ७३० आणि त्यानंतर सीएएविरोधात देशात ठिकठिकाणी आंदोलनं सुरू आहेत. या आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर कलम ३७० आणि सीएएवर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सरकारची भूमिका स्पष्ट केलीय. सरकार निर्णय मागे घेणार नाही, असं मोदींनी ठामपणे सांगितलं. कलम ३७० आणि सीसीए हे आवश्यक होतं. सरकारवर प्रचंड दबाव असतानाही हे निर्णय घेण्यात आले. यामुळे हे निर्णय कायम राहतील, अशी ग्वाही मोदींनी वाराणसीतील जाहीर सभेत दिली.

कित्येक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मुद्द्यांवर महाकालच्या आशीर्वादाने निर्णय घेण्यास आपण सक्षम झालो. कलम ३७० असो की सीएए मोठा दबावा येऊनही सरकारने हे निर्णय घेतले. महाकालच्या आर्शीवादाने घेतलेले हे निर्णय यापुढेही कायम राहतील याची ग्वाही देतो, असं पंतप्रधान मोदी म्हणाले. देशात विविध ठिकाणी सुरू असलेल्या आंदोलनांच्या पार्श्वभूमीर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीही सरकार मागे हटणार नाही, अशीच भूमिका याआधी मांडलीय.



दिल्लीतील शाहीनबागमध्ये सीएए, एनआरसी आणि एनपीआरविरोधात मुस्लिम महिलांचे धरणे आंदोलन सुरू आहे. गेल्या दोन महिन्यांपासून हे आंदोलन करण्यात येत आहे. तसंच मुंबई, दिल्लीसह अनेक ठिकाणी सीएएविरोधात मोर्चे आणि आंदोलनं करून सरकारवर दबाव वाढवण्यात येत आहे. तसंच अनेक राज्यांनी सीएए लागू करणार नसल्याची भूमिका घेतलीय. विरोधकांनीही सीएएवरून सत्ताधारी भाजला टीकेचं लक्ष्य केलंय. या पार्श्वभूमीवर वाराणसीतील जाहीर सभेतून पंतप्रधान मोदींनी सरकारची भूमिका स्पष्ट केलीय.

### राम मंदिरावरही बोलले मोदी

राम मंदिराचे प्रकरण काही दशकांपासून न्यायप्रविष्ठ होतं. आता मंदिर निर्माणाचा रस्ता मोकळा झाला आहे. सरकारने मंदिर निर्माणासाठी ट्रस्टचीही घोषणा केलीय. यामुळे लवकरच अयोध्येत भव्य राम मंदिर तयार होईल, असं मोदी म्हणाले.

# धक्कादायक! दुधात आढळले मेलामाईन

**सोलापूर :** अन्न व औषध प्रशासनाने पंढरपूर तालुक्यातील सुगाव भोसे येथील श्रीराम दूध केंद्रावर छापा मारून जप्त केलेल्या दुधाच्या नमुन्यात मेलामाईन असल्याचा प्रयोगशाळेने अहवाल दिला असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासनाचे सहायक आयुक्त प्रदीप राऊत यांनी दिली.



अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने १० जानेवारी रोजी सुगाव येथील श्रीराम दूध केंद्रावर छापा मारून रसायनाद्वारे तयार केलेले ६३८ लिटर कृत्रिम दूध व असे दूध तयार करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या रसायनयुक्तपावडरीचा २७१९ किलो साठा जप्त करण्यात केला होता.

जप्त केलेल्या साठ्यात एक मेलामाईनची पिशवी आढळली होती. यावरून डेअरी मालक डॉ. दत्तात्रय जाधव व त्याचा नोकर गणेश गवळी यांच्याविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम १८८,२७२,२७३,३२८ व अन्नसुरक्षा व मानके कायदा २००६ चे कलम ५९ अंतर्गत पंढरपूर तालुका पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

डॉ. जाधव याने भेसळयुक्त दूध तयार करण्यासाठी डेअरीमध्ये आणून ठेवलेला व कायद्याने बंदी असलेल्या मेलामाईन या पदार्थाचा ५० किलोचा (किंमत : १० हजार २०० रु.) वापर केल्याचे आढळले होते. त्याचबरोबर २९८ किलो दूध पावडर (३५ हजार ७६० रु.), १२४९ किलो व्हे. परमीट पावडर (१ लाख ९ हजार ९१२ रु.), ८२४ किलो लॅक्टोज पावडर (९८ हजार ८८० रु.), २९८ किलो पॅराफिन (१४ हजार ९०० रु.) असे ४ लाख २ हजार १२ रुपये किमतीचे भेसळीसाठी लागणारे रसायन सापडले होते. हा साठा जप्त करण्यात आला तर तसेच भेसळीने तयार केलेल्या दुधाचे नमुने घेऊन हे दूध जागेवर ओतून देण्यात आले होते.

दुधाचे नमुने मुंबईतील प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवून देण्यात आले होते. प्रयोगशाळेने मेलामाईनबाबत पॉझीटिव्ह अहवाल दिला आहे. भेसळयुक्त दुधात मेलामाईन व स्वॉरबीटॉल, पॅरॉफिन, मिल्क पावडर असल्याचे नमूद केले आहे, असे राऊत यांनी सांगितले.

### दोन्ही केमिस्ट फरार

याप्रकरणी गुन्हा दाखल असलेले तिरुमला डेअरीचा केमिस्ट गोरख धांडे व दुसऱ्या डेअरीतील केमिस्ट साळुंके हे दोघे अद्याप फरार असल्याची माहिती करकंब पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक पाटील यांनी दिली. अन्न व औषध प्रशासनाकडे आलेला अहवाल प्राप्त झाल्यानंतर आरोपींविरुद्ध कारवाई आणखी तीव्र करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यातील केमिस्ट साळुंके हा प्रतिलिटर एक रुपया कमिशन घेऊन दूध स्वीकारत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.









हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. २, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)